# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:22.09.2025** **वार:सोमवार**

1. वस्तू आणि सेवा कराचे सुधारित दर देशभरात लागू
2. नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासूनच देशात बचत उत्सव सुरू होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ
4. अमेरिकेत भारतीय नागरिकांना विसासंबंधी आपत्कालीन मदतीसाठी भारताद्वारे सुविधा आणि
5. आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर सहा गडी राखून विजय

**पंतप्रधान संबोधन**

वस्तू आणि सेवा कराच्या दुसऱ्या टप्प्यातील सुधारणा आजपासून लागू होणार आहेत; त्यामुळे नवरात्रीच्या पहिल्या दिवशी पासूनच देशभरात जीएसटी बचत उत्सव सुरू होणार असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. पंतप्रधानांनी काल संध्याकाळी राष्ट्राला संबोधित केलं. यावेळी त्यांनी बचत उत्सव आणि नवरात्रीसाठी देशवासियांना शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले....

**नवरात्रि के पहले दिन से देश आत्मनिर्भर भारत अभियान के लिए एक और महत्वपूर्ण और बड़ा कदम उठा रहा है। कल, यानी नवरात्रि के प्रथम दिवस 22 सितंबर को सूर्योदय के साथ ही, Next generation GST reforms लागू हो जाएंगे। एक तरह से कल से देश में GST बचत उत्सव शुरू होने जा रहा है।**

वस्तू आणि सेवा कर सुधारणांमुळे देशातील तरुण, नवमध्यम वर्ग, शेतकरी, महिला आणि उद्योजक यांना मोठा फायदा होईल, असं मोदी म्हणाले. केंद्र सरकारनं कर प्रणाली सोपी केली, वस्तू आणि सेवा कराला प्राधान्य देत, इतर अनेक कर समाप्त करण्यात आल्याचं त्यांनी सांगितल. सुधारित दरानुसार आवश्यक वस्तू, औषधे, आरोग्य विमा इत्यादी 5 टक्के कराच्या क्षेत्रामध्ये आले आहेत, व्यापारी, दुकानदार आणि उद्योजकांनाही या सुधारणांचा फायदा होणार असून त्यांनी हा फायदा ग्राहकांपर्यंत पोहचवावा असं आवाहन त्यांनी केलं. ते म्हणाले...

**पिछले 11 साल में देश में 25 करोड़ लोगों ने गरीबी को हराया है, और गरीबी से बाहर निकलकर के, 25 करोड़ का एक बहुत बड़ा समूह नियो मिडिल क्लास के रुप में आज देश के अंदर बहुत बड़ी भूमिका अदा कर रहा है। इस नियो मीडिल क्लास की अपनी Aspirations हैं, अपने सपने हैं। और स्वाभाविक है जब 12 लाख रुपए की इनकम टैक्स में राहत हो जाए तो मध्यम वर्ग के जीवन में तो कितना बड़ा बदलाव आता है।**

नागरीक देवो भवः या मंत्रानुसार सरकार पुढे जात आहे, या सुधारणा आत्मनिर्भरतेची वाट सुकर करत असल्याचं सांगत पंतप्रधानांनी नागरिकांना स्वदेशी वापराचं आवाहन केलं.

**सेवा पर्व-मेट्रो सेवा**

सेवा आणि सुशासन, हे सूत्र समोर ठेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारन गेल्या 11 वर्षात अनेक क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या आहेत. सेवा पर्वच्या आजच्या भागामध्ये, ऐकुयात मोदी सरकारन शहरी जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी केलेल्या सुधारणांबद्दल .....

**भारतामध्ये मेट्रो रेल्वे आता फक्त एक परिवहन साधन नसून ती देशाच्या वाढ आणि विकासाच्या अध्यायातली एक जीवनरेखा बनली आहे. शहरी परिवहन विस्तारामध्ये मेट्रो जलद प्रगतीचे प्रतिबिंब असून मेट्रो सेवा महत्त्वाकांक्षा, नाविन्य आणि शाश्वत शहरी जीवनाच्या दृष्टिकोनान चालविली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात, भारत आता जगातील तिसऱ्या क्रमांकाचा मेट्रो रेल्वेच जाळे असणारा देश ठरला आहे. कोलकाता येथे मेट्रो रेल्वे प्रकल्पांचे उद्घाटन करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितलं की....**

**दो हजार चौदा से पहले देश में सिर्फ दो सौ पचास किलोमीटर ही मेट्रो रूट था आज देश में मेट्रो रूट एक हजार किलोमीटर भी ज्यादा का हो गया है, ये सारे काम ईज ऑफ ट्रॅव्हल को बढाने वाले हैं इक्कीस वीं सदी के भारत को इक्कीस वीं सदी के ट्रान्सपोर्ट सिस्टम की भी जरूरत है।**

**मेट्रो सुविधांपासून ते लोकांना घर देण्यापर्यंत, सरकार शहरी भागात जीवनाच्या दर्जात सुधारणा करत असून शहरी जीवन सुलभतेच्या दृष्टीकोनाची पूर्तता करीत आहे.**

**नवरात्र**

शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. देशभरातल्या 51 शक्ती पीठांपैकी साडेतीन शक्तीपीठं महाराष्ट्रात असून सर्वच ठिकाणी आज घटस्थापना होणार आहे. तुळजापूरचं तुळजाभवानी मंदिर, कोल्हापूरचं महालक्ष्मी मंदिर, नांदेड जिल्हातल्या माहुरचं रेणुका माता मंदिर तसंच वणीच्या सप्तश्रृंगी देवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे. पुण्यात भवानी माता, चतुःश्रृंगी माता मंदिरासह ग्रामदेवता तांबडी जोगेश्वरी मंदीरात उत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. यंदा दसरा अकराव्या दिवशी आला आहे, त्यामुळे आजपासून अकरा दिवस राज्यभरात आदिशक्तीचा जागर केला जाणार आहे.

**व्हिसा**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी एच-1 बी व्हिसा अर्जांवर वार्षिक 1 लाख डॉलर्स शुल्क जाहीर केल्यानंतर, वॉशिंग्टनमधील भारतीय दूतावासानं तत्काळ मदतीची गरज असलेल्या भारतीय नागरिकांसाठी एक आपत्कालीन मदत क्रमांक जारी केला आहे. आपत्कालीन मदतीसाठी भारतीय नागरिक +1-202-550-9931 आणि व्हॉट्सॲप या क्रमांकावर कॉल करू शकतात असं एका सोशल मीडिया पोस्टमध्ये भारतीय दूतावासानं म्हटलं आहे. हा क्रमांक तत्काळ आपत्कालीन मदत हवी असलेल्या भारतीय नागरिकांनीच वापरावा, नेहमीच्या इतर चौकशींसाठी नाही असं दूतावासानं स्पष्ट केलं आहे. दरम्यान, भारत सरकारनं आपल्या सर्व कार्यालयांना पुढील 24 तासांत अमेरिकेत परतणाऱ्या भारतीय नागरिकांना सर्व शक्य ती मदत देण्याचे निर्देश दिले आहेत.

**सायबर**

विविध युरोपीय विमानतळांवर वापरल्या जाणाऱ्या कॉलिन्स एरोस्पेस सिस्टीमवर झालेल्या सायबर हल्ल्यांमुळं भारतीय विमानतळांवर आतापर्यंत कोणताही प्रतिकूल परिणाम झालेला नाही. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं सांगितलं की, दिल्ली विमानतळावरही कॉलिन्स म्यूज सॉफ्टवेअरचा वापर केला जातो परंतु आतापर्यंत विमान वाहतुकीवर त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही. युरोपीय सायबर हल्ल्यांच्या वृत्तानंतर सरकारनं भारतात त्वरित तपासणी केली असल्याचं सांगितलं. मात्र, विमानतळांना सतर्क राहण्यास सांगण्यात आलं आहे.

**नेपाळ**

नेपाळच्या सुशीला कार्की यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारनं युवकांच्या निदर्शनांमध्ये 72 लोकांचा मृत्यू आणि के पी शर्मा ओली सरकार पाडण्यास कारणीभूत ठरलेल्या निदर्शनांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यांची चौकशी समिती स्थापन केली आहे. गृहमंत्री ओम प्रकाश अर्याल यांनी काठमांडूमधील सिंहदरबार सचिवालयात पत्रकारांना ही माहिती दिली. चौकशी आयोगाला तीन महिन्यांत सरकारला आपला अहवाल सादर करायचा असल्याचं त्यांनी सांगितलं.

**रेल्वे- मालवाहतूक**

भारतीय रेल्वेनं उत्तर प्रदेशातील प्रमुख उत्पादन आणि वापर केंद्रांना जोडून नियोजनबद्ध, वस्तू-विशिष्ट, वेळेनुसार मालवाहतूक सेवा सुरू करून मालवाहतुकीत वाढ केली आहे. ग्राहकांचं समाधान सुधारणं, विश्वसनीय वाहतूक अवधी सुनिश्चित करणं आणि उद्योगांशी संलग्न सुविधा प्रदान करण्याचा यामागे उद्देश असल्याचं एका निवेदनात रेल्वेनं म्हटलं आहे. नव्यानं सुरू झालेल्या सेवांमध्ये लुधियाना ते वाराणसी अन्नपूर्णा सेवा, सरासरी 17 तासांत अन्नधान्य वाहतूक, फारुखनगर ते लखनऊपर्यंत स्वयंचलित वाहनांसाठी 28 तासांत गतीमान सेवा, गढी ते मुंद्रा बंदरापर्यंत कंटेनरसाठी 32 तासांत कार्गो सेवा आणि रूपनगर ते अनंतनागपर्यंत सिमेंट वाहतूक करणारी सेवा यांचा समावेश आहे.

**आरोग्य मंत्रालय - स्वस्थ नारी**

देशभरात अंदाजे तीन लाख आरोग्य शिबिरं आयोजित करण्यात आली असल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे. 17 सप्टेंबर रोजी सुरू झालेल्या या मोहिमेत देशभरात मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून येत आहे आणि लाखो महिला, मुलं आणि कुटुंबीय व्यापक आरोग्य सेवांचा लाभ घेत आहेत. देशभरातील 76 लाखांहून अधिक नागरिकांनी या मोहिमेसाठी नोंदणी केली आहे असल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

**अलमट्टी**

कृष्णा नदीवरील अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याच्या कर्नाटक राज्य सरकारच्या प्रस्तावाला तेलंगण राज्यानं विरोध केला आहे. तेलंगणचे पाटबंधारे मंत्री एन. उत्तम कुमार रेड्डी यांनी सांगितलं की, अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याच्या कर्नाटकच्या प्रस्तावावर सरकार आपली बाजू मांडेल. सूर्यपेट जिल्ह्यात काल बोलताना मंत्री म्हणाले की, सध्या सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होत असून त्यात तेलंगणची बाजू आपण मांडणार आहोत. कृष्णा आणि गोदावरीच्या पाण्यातील राज्याच्या वाट्याशी कोणत्याही किंमतीत तडजोड केली जाणार नाही असं रेड्डी यांनी स्पष्ट केलं.

**क्रिकेट**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत काल रात्री दुबई इथं झालेल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानचा सहा गडी राखून पराभव केला. पाकिस्ताननं दिलेलं 172 धावांचं आव्हान भारतानं 18 षटकं आणि 5 चेंडूत साध्य केलं. सलामीवीर अभिषेक शर्मानं सहा चौकार आणि पाच षटकारांसह 39 चेंडूत 74 धावा केल्या तर शुभमन गिलनं 28 चेंडूत 47 धावा करत अभिषेकसह 105 धावांची सलामी भागीदारी केली. अभिषेक शर्मा सामनावीर ठरला. या स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानचा सात गडी राखून पराभव केला होता.

**हवामान**

महाराष्ट्रातील विदर्भात तुरळक ठिकाणी तर राज्यातल्या इतर विभागात बहुतांश ठिकाणी आज पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. तुरळक ठिकाणी विजांसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.